●बीड(महाराष्ट्र) ●वर्ष ५ वे ●अंक ११५ ●शुक्रवार, दि. २५ जुलै २०२५ ●RNI-MAHMAR/2021/80074 ●Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ●पान १ ●पाने ४ ●किंमत ३ रूपये
● Beed (Maharashtra) ● Year 5 ●Issue 115 ● Friday, 25 July 2025 ● RNI-MAHMAR/2021/80074 ● Post: Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 ● Page 1 ● Pages 4 ●Price 3 Rs.




दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज
● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




बीड ● dailymarathwadapatra2021@gmail.com ● https://marathwadapatra.com ● https://epaper.marathwadapatra.com Mo. 9822152955

# सत्यमेव जयते : धनंजय मुंडे

## धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळातील कृषी विभागाची ती खरेदी नियमानुसारच: उच्च न्यायालयाचा निर्णय



● खोटी याचिका दाखल करणाऱ्या याचिका कर्ता तुषार पडगिलवार यास एक लाखांचा दंड
● मुंबई उच्च न्यायालयाकडून कृषी साहित्य खरेदीबाबत राज्य शासनाच्या निर्णयास दुजोरा, दोन्ही याचिका फेटाळल्या
● माजी कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी राबवलेली खरेदी प्रक्रिया योग्यच : मुंबई उच्च न्यायालयाचे शिक्कामोर्तब

**मुंबई । प्रतिनिधी**

तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या कार्यकाळात राज्य शासनाच्या कृषी विभागाने शेती पूरक साहित्य खरेदी साठी राबवलेल्या विशेष कृती आराखड्यांतर्गत कृषी साहित्याच्या थेट खरेदी व वितरणाच्या निर्णयास मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरवले असून, यास विरोध करणाऱ्या दोन्ही याचिका फेटाळल्या आहेत. न्यायमूर्ती आलोक आराधे व संदीप व्ही. मर्णे यांच्या खंडपीठाने हा निर्णय दिला. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांच्या भोवती या धोरणात्मक निर्णयाच्या विरोधात आरोपांची राळ उठवून व्यावसायिक दृष्टिकोन ठेऊन चुकीचे आरोप करण्यात आले होते. मात्र धनंजय मुंडे यांनी राज्य मंत्रिमंडळाची रीतसर मान्यता घेऊनच शेतकऱ्यांच्या हितासाठी हा धोरणात्मक निर्णय घेऊन सदर प्रक्रिया राबवली, असे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

**● सत्यमेव जयते! - धनंजय मुंडे**

दरम्यान शेतकरी वर्गास उत्पन्न वाढीच्या दृष्टीने देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या धोरणाचा विचार करून शेतकऱ्यांच्या हीतास प्राधान्य देणारा धोरणात्मक निर्णय राज्य मंत्रिमंडळाने घेतला होता. त्याच्या विरोधात अनेकांनी माझ्यावर आरोप करून माझी बदनामी केली; मात्र आज न्याय देवतेने सत्याची बाजू समोर आणत योग्य न्याय केला असून आपला तो निर्णय योग्यच होता, असे म्हणत सत्यमेव जयते अशी प्रतिक्रिया या निकालावर व्यक्त केली आहे.

प्रकरणाची पार्श्वभूमी: राज्य शासनाने १२ मार्च २०२४ रोजी काढलेल्या शासन निर्णयानुसार, बॅटरीवर चालणारे स्प्रेयर, नॅनो युरिया, नॅनो डीएपी, मेटाल्डिहाईड कीटकनाशक व कापूस साठवणीसाठी बॅग्स यांसारख्या पाच वस्तू शेतकऱ्यांना थेट खरेदी करून महाराष्ट्र अॅग्रो इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (MAIDCL) व महाराष्ट्र स्टेट पॉवरलूम कॉर्पोरेशन (MSPCL) यांच्यामार्फत पुरवण्याचे नियोजन करण्यात आले होते. या निर्णयावरून धनंजय मुंडे यांच्या नावाने घोटाळा हा शब्द वापरून अनेकांनी मुंडेंची व कृषी विभागाची बदनामी केली होती. या निर्णयाला विरोध करताना Agri Sprayers TIM Association व उमेश भोळे यांच्यासह तीन शेतकऱ्यांनी स्वतंत्र याचिका व जनहित याचिका दाखल करून या वस्तूंना थेट लाभ हस्तांतरण (DBT) योजनेतून वगळण्यास विरोध दर्शवला होता.

राज्य शासनाची बाजू: राज्य शासनाने आपली बाजू मांडताना स्पष्ट केले की, २०१६ मधील DBT योजना व २०२३-२४ मधील विशेष कृती आराखडा ही दोन्ही योजना स्वतःच्या

▶▶ उर्वरित पान २ वर

# जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात संघर्ष समितीची निदर्शने

## उपजिल्हाधिकाऱ्यांना निवेदन ; विरोधक एकवटले

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

उपजिल्हाधिकारी कार्यालयासमोर जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात 'जनसुरक्षा कायदा विरोधी संघर्ष समिती'कडून जोरदार घोषणाबाजी करीत तीव्र निदर्शने करण्यात आली. एकवटलेल्या विरोधी पक्ष आणि संघटना यांनी एकत्रितपणे येवून केलेल्या कायदा विरोधी संघर्ष समितीकडून उपजिल्हाधिकाऱ्यांना

▶▶ उर्वरित पान २ वर




# भीषण अपघात पती-पत्नी ठार



**पाटोदा । प्रतिनिधी**

पाटोदा ग्रामीण रुग्णालया समोर आज सकाळी एक भीषण अपघात घडला. एसटी बसच्या जोरदार धडकेत दुचाकीस्वार पती-पत्नी जागीच ठार झाले आहेत. या दुर्दैवी अपघातात मृत्यू झालेल्यांची नावे बाळू केशव वायकर आणि त्यांची पत्नी लता बाळू वायकर, रा. घाटेवाडी, ता. पाटोदा, जिल्हा बीड अशी आहेत. दुचाकीवरून जात असताना रुग्णालया समोर एसटी बसने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली.

▶▶ उर्वरित पान २ वर

# सातबाऱ्यावरून बोजा कमी करण्यासाठी घेतली लाच

## तलाठ्यासह खाजगी इसम एसीबीच्या जाळ्यात

**बीड । प्रतिनिधी**

सातबाऱ्यावरून बोजा कमी करण्याच्या कामासाठी तीन हजार रुपयांची लाच मागणाऱ्या तलाठ्यासह त्याला मदत करणाऱ्या खाजगी इसमाला बीड लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहाथ अटक केली आहे. ही कारवाई बुधवारी (दि. २३ जुलै) डोईठाण येथील कार्यालयात करण्यात आली.

अशोक रघुनाथ सुडके (वय ४८, रा. कोरडगाव, ता. पाथर्डी)



असे अटक करण्यात आलेल्या तलाठ्याचे नाव असून ते आष्टी तालुक्यातील डोईठाण सज्जाचे काम पाहत होते. तर बापुराव रावसाहेब क्षीरसागर (वय ५४, रा. डोईठाण, ता. आष्टी) हा खाजगी इसम लाच व्यवहारात मध्यस्थी करत होता. तक्रारदाराच्या मालकीतील जमिनीवरील बोजा सातबाऱ्यावरून कमी करणे आणि नव्याने खरेदी केलेल्या जमिनीचा फेरफार नोंदवण्यासाठी तलाठ्याने प्रत्येकी १५०० रुपयांची, एकूण तीन हजार रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराने ही माहिती बीड एसीबीकडे दिल्यानंतर सापळा रचण्यात आला. त्यानुसार डोईठाण येथील महसूल कार्यालयातच अशोक सुडके यांनी २५०० रुपये लाच स्वीकारली, तर क्षीरसागर यांनी

▶▶ उर्वरित पान २ वर

# सामाजिक कार्यकर्त्याने वृतपत्रातील बातमी सोशल मीडियावर शेअर केल्याने बातमीतील सबंधिताच्या नातेवाईकाकडुन शिविगाळ!

**तलवाडा । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील पोलीस स्टेशनच्या हाद्दीत काही दिवसापुर्वी शाळकरी मुलींची रस्त्यात आडऊन छेड काढण्यात आली होती. मुलींच्या पालकांनी व मुलींनी तलवाडा पोलीस स्टेशनला या बाबतीत माहिती देत संबधित छेड काढणा-या मुलांच्या विरोधात गुन्हा दाखल केला होता. पोलीस स्टेशन मध्ये दाखल केलेल्या एफ आर च्या प्रेसनोट प्रमाणे संबधित घटनेच्या आणुषंगाने वृतपत्रात सविस्तर बातम्या प्रकाशित झाल्या होत्या. इतरत्र पालकांनी आप आपल्या पाल्यांची काळजी व दक्षता घ्यावी या सोजळ भावनेतुन सामाजिक बांधिलकी म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांनी या बातम्या सोशल मीडियावर शेअर केल्या होत्या याचा राग मनात धरून घटनेशी सबंधित आसलेल्या मुलांच्या एका नातेवाईक हितचिंतकाने घटनेचे गांभीर्य लक्षात न घेता ऊलट छेड काढणा-या मुलांचे उघड उघड समर्थन करत सोशल मीडियावरील बातम्या डिलीट कराव्यात या हेतुने स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे

▶▶ उर्वरित पान २ वर

# पुण्यातून अल्पवयीन मुलीची सुटका; आरोपीला ठोकल्या बेड्या

## पीएसआय पल्लवी जाधव आणि अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक पथकाची कारवाई

**बीड । प्रतिनिधी**

बीड पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष (AHTU) पथकाने पुणे शहरातून एका अल्पवयीन मुलीची सुटका करत आरोपीस ताब्यात घेण्यात यश मिळवले आहे. पोलीस उपनिरिक्षक पल्लवी जाधव यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही धाडसी कारवाई केली. ही कारवाई



पोलीस अधीक्षक नवनीत कावत व अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. शिवाजीनगर पोलीस ठाण्यात या संदर्भाने दाखल गुन्हा अधिक तपासासाठी क्ढण कडे वर्ग करण्यात आला होता. सदर प्रकरणाची जबाबदारी पीएसआय पल्लवी जाधव यांच्याकडे

▶▶ उर्वरित पान २ वर

# बहुचर्चित बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कसले यांचा जामीन फेटाळला

**बीड । प्रतिनिधी**

पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांचा अर्ज मा.दुसरे सत्र न्यायालय बीड येथे दाखल केला होता.फिर्यादी मोहन बाबासाहेब आघाव यांनी दिनांक ३०/५/२०२५ रोजी सायबर पोलीस स्टेशन बीड येथे गुन्हा नंबर २३/ २०२५ रणजीत कासले यांच्या विरोधात बी एन एस १९६ व ६७, ८४(क) सी माहिती तंत्रज्ञान अधिनियम अंतर्गत गुन्हा दाखल केला होता. सोशल मीडियावर



ऑनलाईन व्हिडिओ प्रसारित करून दोन जातीत तेढ निर्माण करण्याचे काम केले असून बीड

▶▶ उर्वरित पान २ वर




# राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनात उपविभागीय अधिकारी विकास माने यांनी केला १६ कोटींचा अपहार ? - वंचित बहुजन आघाडीची तक्रार

**● भ्रष्टाचार करणाऱ्या अधिकाऱ्यांनी छापले अन् बदल्या करून गेले**

राष्ट्रीय महामार्ग २११ मध्ये अंदाजे १०० ते १५० कोटीचा भ्रष्टाचार झाला आहे. एक एक प्रकरण समोर येत आहे त्या अनुषंगाने तक्रार करत भ्रष्टाचार बाहेर काढणं सुरू आहे. उपविभागीय अधिकारी, उपजिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी यांनी संगनमताने भ्रष्टाचार केला आणि तो उघड होण्याच्या अगोदर बदल्या करून गायब झाले. प्रशासनाने तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करून संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करावी अशी मागणी विभागीय आयुक्त प्रधान सचिव यांच्याकडे केली आहे आता ते काय कारवाई करतात याकडे लक्ष लावून आहे. अजय सरवदे, जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (प)

**बीड । प्रतिनिधी**

धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गासाठी बीड जिल्ह्यात करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत १६ कोटी ३६ लाख रुपयांचा शासकीय निधी अपहार झाल्याचा आरोप वंचित बहुजन आघाडीने केला आहे.

वंचित बहुजन आघाडीचे बीड जिल्हाध्यक्ष प्रतिक उर्फ अजय सरवदे यांनी महसूल व वन विभाग, विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी व राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे तक्रार सादर केली असून, तत्कालीन उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्यावर गंभीर आरोप करण्यात आले आहेत.

तक्रारीनुसार, गेवराई, बीड, चौसाळ आणि धोत्रा या गावांमधील अकृषिक आदेशांच्या मूळ नोंदी अभिलेखात नसताना, केवळ छायाचित्रित प्रतींच्या आधारावर जमिनींना अकृषिक दर लावून कोट्यवधींच्या नुकसानभरपाईचे आदेश दिले गेले. नगर रचनाकारांची शिफारसही घेतलेली नव्हती, कर भरण्याचे पुरावेही नव्हते, तसेच प्रत्यक्ष बांधकामाचे पुरावे अनुपस्थित होते, असे सरवदे यांनी निदर्शनास आणले आहे.

सरवदे यांनी केलेल्या तक्रारीत पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत - जास्तीची भरपाई घेतलेल्या भूधारक व अधिकाऱ्यांकडून १६ कोटींची रक्कम वसूल करावी, तत्कालीन उपविभागीय अधिकारी विकास माने यांच्यावर गुन्हा दाखल करून चौकशी करावी, भविष्यातील भूसंपादन प्रक्रियेत कठोर नियमावली लागू करावी, सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करावी. या तक्रारीमुळे भूसंपादनातील पारदर्शकतेच्या प्रश्नावर पुन्हा एकदा प्रकाश पडला आहे.



◆ पान १ वरून पुढे...

## धनंजय मुंडे...

स्वरूपात वेगळी असून त्यांची उद्दिष्टे ही केवळ शेतकऱ्यांचे हीत एवढेच आहेत. विशेष कृती आराखड्याचा उद्देश शेतकऱ्यांना केवळ आर्थिक मदत नव्हे, तर पीक उत्पादन, प्रशिक्षण, प्रात्यक्षिके यांचा सम ावेश असलेले सर्वांगीण पाठबळ देणे हा आहे व तो पूर्णपणे योग्य आहे. शासनातर्फे ॲड. अंतुरकर, ॲड. व्यंकटेश दौंड, ॲड. कुंभकोनी यांनी बाजू मांडली. न्यायालयाचा निर्णय: न्यायालयाने नमूद केले की DBT योजना व विशेष कृती आराखडा यांचा एकमेकांशी संबंध नाही. शासनाने धोरणात्मक निर्णय घेतले असून त्यात हस्तक्षेप करण्याचे कारण नाही. लेखी याचिका ३२६०/२०२४ फेटाळताना न्यायालयाने स्पष्ट केले की याचिकाकर्ते केवळ आपल्या व्यवसायाच्या हितासाठी न्यायालयात आले आहेत. तसेच या प्रकरणाचा वापर करून अनेकांनी शासनाच्या तत्कालीन धोरणावर चुकीचे भाष्य करून बदनामी साध्य केली. PIL क्र. २५/२०२५ हीसुद्धा न्यायालयाने खाजगी व्यावसायिक हेतू असल्याचे म्हणत फेटाळली आहे. विशेषत: याचिकाकर्ते तुषार पाडगिलवार यांनी न्यायालयीन प्रक्रियांचा गैरवापर करत फोरम शॉपिंग केल्याबद्दल ₹ १ लाख दंड ठोठावण्यात आला. हा दंड ४ आठवड्यांत हायकोर्ट विधी सेवा प्राधिकरणाकडे भरावा लागेल; अन्यथा संबंधित जिल्हाधिकाऱ्याद्वारे भूमिकराप्रमाणे वसुलीचे आदेश देण्यात आले आहेत. याचिका कर्त्यांची खोटी भूमिका उघड- विशेष म्हणजे स्प्रेयर निर्माते तुषार पडगीलवार यांनी स्वत:च्या खाजगी हितासाठी प्रथम मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली, पण निर्णय विरोधात जाईल हे लक्षात येताच त्यांनी मुख्य मागण्या मागे घेतल्या. त्यानंतर त्यांनी नागपूर न्यायालयात जनहित याचिकेच्या नावाखाली काही शेतकऱ्यांना पुढे करत खोटे बिल्स व खोटे पुरावे दाखवून न्यायालयाची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. यावरही न्यायालयाने भाष्य केले आहे. या निर्णयामुळे राज्य शासनाच्या कृषी उत्पन्नवाढीच्या विशेष कृती आराखड्याला न्यायालयीन मान्यता मिळाली आहे. तत्कालीन कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी राबवलेली ही थेट खरेदी प्रक्रिया पारदर्शक व शेतकऱ्यांच्या हितास पूरक असल्याचे निकालात नोंदवले आहे. त्यामुळे या विषयाच्या आडून धनंजय मुंडे यांची बदनामी करणाऱ्यांना उच्च न्यायालयाने जोरदार चपराक लगावली आहे; असेच म्हणावे लागेल.

## जनसुरक्षा कायद्याच्या...

महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा अधिनियम - २०२४ हा कायदा रद्द करण्यात यावा या मागणीचे निवेदन देण्यात आले. अंबाजोगाईत जनसुरक्षा कायदा विरोधी संघर्ष समितीकडून जोरदार घोषणाबाजी करीत तीव्र निदर्शने करण्यात आली. यावेळी माजी आमदार पृथ्वीराज साठे यांनी अर्बन नक्षलवादाचा बिमोड करण्यासाठी जनसुरक्षा कायदा आणल्याचा सरकारचा दावा अत्यंत हास्यास्पद आहे असे सांगितले. तर राजेसाहेब देशम ुख यांनी सांगितले की, जनसुरक्षा हा कायदा आतून बाहेरून काळा असून सामान्यांची गळचेपी करणारा आहे. त्यामुळे जनतेचा सुरूवातीपासूनच

◆ पान १ वरून पुढे...

त्याला विरोध आहे. सभागृहात सत्ताधारी पक्षाकडे बहुमत असल्याने त्यांनी बहुमताच्या जोरावर रेटून नेत कायदा मंजूर करून घेतला आहे, असा आरोप राजेसाहेब देशमुख यांनी करून केंद्र व राज्य सरकारचा परखड शब्दांत समाचार घेतला. आजची निदर्शने ही जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात असल्याचे कॉ.बब्रुवाहन पोटभरे यांनी सांगितले. डॉ.नरेंद्र काळे यांनी 'जनसुरक्षा कायद्याचा' तीव्र निदर्शने करून हा कायदा लोकशाहीच्या मुल्यांची गळचेपी करणारा असून, जनतेच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणणारा आहे. त्यामुळे हा कायदा रद्द करावा. व महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी राजीनामा द्यावा. या दोन्ही प्रकारांवर तीव्र शब्दांत निषेध व्यक्त करतो. असे सांगितले. जनसुरक्षा कायद्याच्या विरोधात आम्ही संघर्ष समितीकडून उपजिल्हाधिकाऱ्यांना जनसुरक्षा कायदा रद्द करण्याची मागणी करणारे निवेदन देत आहोत हे नमूद केले. तर जनसुरक्षा कायदा देशांतर्गत सुरक्षेच्या नांवाखाली सामान्य नागरिकांच्या मूलभूत हक्कांवर गदा आणू शकतो असे कॉ.ॲड.अजय बुरांडे म्हणाले. अमर देशमुख यांनी जनसुरक्षा या कायद्याला तीव्र विरोध दर्शवत, त्याची अंमलबजावणी थांबवावी आणि कायदा रद्द करावा, अशी मागणी केली. ॲड.माणिक आदमाने जनसुरक्षा कायद्यामागचा हेतूच मुळात काळा आहे. या कायद्याचा फायदा फक्त सरकार व सरकार धार्जिणे उद्योगपती यानांच होणार आहे. असे सांगितले. तर ॲड.शिवाजी कांबळे यांनी, 'सरकारचे फक्त कौतुक करा नाही तर गप्प बसा आणि विरोधात बोलाल तर जनसुरक्षा कायद्याचा बडगा उभारून तुम्हाला गप्प करू हाच यामागचा हेतू आहे', असा आरोप केला. ॲड.माधव जाधव यांनी हा कायदा नागरिकांच्या मुलभूत अधिकारांवर गदा आणणारा आहे असे सांगितले. तर ॲड.इस्माईल गवळी यांनी जनसुरक्षा कायद्याची मनमानी खपवून घेणार नाही असा इशारा दिला. यावेळी अभिजीत लोमटे व शैलेश कांबळे यांनी ही या कायद्याच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी केली. तर यावेळी निदर्शकांना रामकिसन मस्के, असिफोद्दीन बाबा खतीब, मदनलाल परदेशी, अश्विनीताई यादव, संजिवनीताई देशमुख, उषाताई चव्हाण, अशोक पालके यांच्यासह सहभागी विविध राजकीय पक्ष आणि संघटनांच्या प्रतिनिधींनी संबोधित केले. निदर्शनात माजी आमदार पृथ्वीराज साठे, राजेसाहेब देशमुख, कॉ.बब्रुवाहन पोटभरे, डॉ.नरेंद्र काळे, अमर देशमुख, कॉ.ॲड.अजय बुरांडे, रामकिसन मस्के, ॲड.माणिक आदम ाने, ॲड.माधव जाधव, ॲड.शिवाजी कांबळे, असिफोद्दीन बाबा खतीब, म दनलाल परदेशी, शैलेश कांबळे, अश्विनीताई यादव, संजिवनीताई देशमुख, उषाताई चव्हाण, अशोक पालके, अभिजीत लोमटे, ॲड.इस्माईल गवळी, सिध्दू लोमटे, अंकुश ढोबळे, प्रशांत पवार, लहू शिंदे, हमीद चौधरी, सुधाकर जोगदंड, ॲड.भोसले, ॲड.विलास लोखंडे, प्रा.धुळे सर, सतिश जोगदंड, जीवन घाडगे, राजेश परदेशी, नानासाहेब ढगे, सोमनाथ धोत्रे, सालेहा शेख, जिलानी शेख, व्यंकट ढाकणे, सय्यद पाशू करीम, स्वप्निल ओव्हाळ, तानबा लांडगे, शेख अब्दुल शेख खाजा, ॲड.खान, समियोद्दीन मोमीन यांच्यासह भारतीय राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना (उबाठा), समाजवादी पार्टी, मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष,

◆ पान १ वरून पुढे...

वंचित बहुजन आघाडी, बहुजन रिपब्लिकन सोशालिस्ट पार्टी, मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, डिपीआय, युवा आंदोलन आदींसह सरकार विरोधी राजकीय पक्ष, संघटना यांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने सहभागी होत, जोरदार घोषणाबाजी करीत या कायद्याला विरोध दर्शविला.

जनसुरक्षा कायदा सामान्यांची गळचेपी करणारा – राजेसाहेब देशमुख

'जनसुरक्षा कायदा ही दडपशाही आहे ? आज रोजी महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक - २०२४ विरोधात आम्ही निदर्शने केली आहेत. हे विधेयक लोकशाही, वैचारिक स्वातंत्र्य आणि नागरी हक्कांसाठी घातक आहे. वादग्रस्त आणि असंवैधानिक महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक २०२४ त्वरित मागे घ्यावे. या विधेयकाच्या नांवाखाली राजकीय विरोधक, कामगार चळवळी, विद्यार्थी चळवळी, सामाजिक कार्यकर्ते यांना गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न बंद करावा. विधेयकावर व्यापक जनचर्चा आणि सार्वजनिक सुनावणी आयोजित करावी. हे विधेयक केवळ 'जनसुरक्षा'च्या नांवाखाली लोकशाहीचा गळा आणणारे आहे. कलम २२,९,१२,१४,१५ इत्यादी कलमे मनमानी अटक, मालमत्तेची जप्ती, आणि वैचारिक म तभेदांवर कारवाईसाठी वापरली जाऊ शकतात. हे सरकारचे दडपशाहीचे हत्यार असून आम्ही अशा काळ्या कायद्याला कधीच मान्यता देणार नाही.' अन् राजेसाहेबांनी पत्ते फेकले : महाराष्ट्राचे कृषी मंत्री माणिकराव कोकाटे हे विधान भवनासारख्या पवित्र स्थळी रम्मीचा खेळ खेळताना दिसले, ही बाब अत्यंत लाजीरवाणी व अपमानास्पद आहे. सामाजिक प्रश्नांवर उत्तरं देण्याऐवजी मंत्री असं वर्तन करतात, ही गोष्ट जनतेच्या भावनांशी खेळ करण्यासारखी आहे. यामुळे उपमुख्यमंत्री अजितदादा यांनी कृषीमंत्री कोकाटे यांचा तात्काळ राजीनामा घ्यावा अशी मागणी करीत राजेसाहेब देशमुख यांनी रस्त्यावर पत्ते फेकून प्रतिकात्मक आंदोलन करून कृषीमंत्री कोकाटे व महायुती सरकारचा निषेध केला.

## भीषण अपघात ...

या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला. घटनेनंतर परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून नागरिकांनी मदतीसाठी पुढाकार घेतला. पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन मृतदेह पाटोदा ग्रामीण रुग्णालयात हलवले असून अपघाताबाबत पुढील तपास सुरू आहे.

## सातबाऱ्यावरुन बोजा...

लाच देण्यासाठी तक्रारदाराला प्रवृत्त केले. या कारवाईनंतर दोघांवर आष्टी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना अटक करण्यात आली आहे. ही कारवाई लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या पोलीस अधीक्षक माधुरी कांगणे, अप्पर पोलीस अधीक्षक सुरेश नाईकनवरे यांच्या मार्गदर्शनाखाली बीडचे उपअधीक्षक सोपान चिट्टमपल्ले, निरीक्षक राहुलकुमार भोळ, समाधान कवडे, सहायक निरीक्षक सुरेश सांगळे व त्यांच्या पथकाने केली. पथकात मच्छिंद्र बीडकर, पांडूरंग काचगुंडे, अनिल शेळके, गणेश म्हेत्रे, अविनाश गवळी, अमोल खरसाडे, प्रदीप

◆ पान १ वरून पुढे...

सुरवसे व अंबादास पुरी यांचा समावेश होता.

## सामाजिक कार्यकर्त्याने...

उप युवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांना इस्टाग्राम या सोशल मीडियावरुन आर्वच्छ भाषेत शिविगाळ केल्याने शेख खिजर जैनोदीन यांनी दिनांक २४/०७/२०२५ रोजी पोलीस स्टेशन तलवाडा येथे ज्ञानेश्वर पालवे रा. रायमोह याने आरोपीचे समर्थन करुन बातम्या डिलीट करण्या संदर्भात म्हणना-या तरुणा विरोधात फिर्याद दिली असुन तलवाडा पोलीसांनी कलम १७४ बी. एन. एस अंतर्गत गुन्हा दाखल केला असुन पुढील तपास तलवाडा पोलीस करीत.

## पुण्यातून अल्पवयीन...

सोपवण्यात आली. तपासाची सूत्रे हाती घेतल्यानंतर पल्लवी जाधव यांनी गुन्ह्याच्या मूळ कागदपत्रांचा सखोल अभ्यास केला. त्यानंतर त्यांनी पीडित मुलीच्या आई व भावाची भेट त्यांच्या राहत्या घरी जाऊन घेतली आणि महत्त्वपूर्ण माहिती मिळवली. मिळालेल्या माहितीच्या आधारे अत्याधुनिक तांत्रिक साधनांचा वापर करून कौशल्यपूर्ण पद्धतीने तपास करण्यात आला. त्यात पीडित मुलगी व आरोपी यांचे लोकेशन पुणे येथे असल्याचे स्पष्ट झाले. यानुसार, दिनांक १९ जुलै २०२५ रोजी सकाळी पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांच्या आदेशानुसार कढण चे पथक पुणे शहरासाठी रवाना झाले. चिंचवड पोलीस ठाण्याच्या हद्दीतील लक्ष्मीनगर, वाल्हेकरवाडी येथील एका अपार्टमेंटमध्ये छापा टाकण्यात आला. तेथून पीडित मुलगी आरोपीच्या ताब्यात आढळून आली. तत्काळ त्यांची सुटका करत आरोपीस ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर AHTU पथक पीडितेसह बीड येथे परतले व दोघांनाही पुढील कार्यवाहीसाठी शिवाजीनगर पोलीस ठाण्यात हजर करण्यात आले. या कारवाईत पोलीस उपनिरीक्षक पल्लवी जाधव यांच्यासह पोलीस हवालदार उषा चौरे, हेमा वाघमारे, प्रदीप येवले, अशोक शिंदे, पोलीस शिपाई प्रदीप वीर व योगेश निर्धार यांनी मोलाची भूमिका बजावली.

## बहुचर्चित बडतर्फ...

जिल्ह्यातील विद्यमान आमदार व माजी मंत्री धनंजय मुंडे विषयी यांना अर्वाच्छे भाषेत शिवीगाळ अश्लील टिप्पणी केली होती यामुळे जिल्ह्यात जातीय तेढ , हिंसा ,सामाजिक परिस्थिती अस्थिर होण्याची परिस्थिती निम ाण झाली होती फिर्यादी कडून योग्य मुद्देसूद तसेच कायदेशीर बाजू अँडवोकेट किशोर. बी .खेडकर यांनी मांडल्यामुळे बहुचर्चित बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजीत कासले यांचा जामीन आज दिनांक २४/७/२०२५ रोजी दुसरे सत्र न्यायालय बीड यांनी फेटाळून लावला.यासाठी विशेष सहकार्य अँडवोकेट अनिल बारगजे व इतर अँडवोकेट बी.एन.झिने अँडवोकेट विलास ढाकणे एडवोकेट विग्ने व ॲडव्होकेट एस.ए.चव्हाण यांचे सहकार्य लाभले.

◆ पान ४ वरून पुढे...

## पोलिसाकडे याचिकाकर्त्याला...

सहाय्यक अभियंता गु. व. णी बीड शहर उपविभाग व शाहूराज मोहनराव चव्हाण सहाय्यक अभियंता बीड ग्रामीण उपविभाग या दोघांना समितीचे सदस्य नेमण्यात आले व सदरील समितीने श्री मिसाळ व श्री कसबे यांचे जबाब नोंदवून प्रत्यक्ष स्थळंपाणी करून सदरील प्रकरणाची चौकशी केली. वरील प्रकरणात वारंवार तक्रारी अर्ज देऊन देखील महावितरणाच्या वरिष्ठ अधिकारी यांनी महावितरणचे लाखो रुपयांचे नुकसान झालेले असताना देखील व चौकशी अति प्राथमिक स्वरुपात चोरीचा दखलपात्र गुन्हा तसेच गुन्ह्यास पात्र विश्वासघात तसेच फसवणुकीचा गुन्हा व लाच प्रतिबंधक कायद्याखाली गुन्हा नोंदवला नाही व सदरील गुन्हा महावितरणाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याने दाखल करण्याचा अधिकार असल्यामुळे तो त्यांनी दाखल न करता गुन्हेगारास संरक्षण दिले त्या विरोधामध्ये बिलाल युसुफ शेख यांनी म ान्य उच्च न्यायालय खंडपीठांमध्ये फौजदारी याचिका क्रमांक ८३८/२०२५ ॲड एन एल जाधव यांच्या मार्फत दाखल केली होती. सदरील याचिकेमध्ये विद्युत अधिनियम कायदा २००३ कलम १३५ चोरी करणे तसेच चोरलेले साहित्य खरेदी करणे तसेच गुन्हा करण्यासाठी प्रोत्साहन देणे याबाबतच्या गुन्हा दाखल करण्यासाठी तक्रार करण्याचा अधिकार महावितरण व त्यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या असल्यामुळे या प्रकरणात म हावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना गुन्हा नौदवन्याचे निर्देश द्यावेत अशी याचिकेत विनंती करण्यात आली. वरील याचिकेची सुनावणी दिनांक २१/०७/२०१५ रोजी माननीय उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद माननीय न्यायमूर्ती श्रीमती विभा कंकणवाडी व न्यायमूर्ती संजय देशमुख यांच्यासमोर झाली असता माननीय उच्च न्यायालयाने विद्युत अधिनियम कायदा २००३ कलम १५१ मध्ये महावितरण अथवा त्यांनी प्राधिकृत केलेले अधिकारी हे अशा प्रकरणात संबंधितावर विभागीय कार्यवाही करू शकतात व संबंधितावर फौजदारी गुन्हा नोंद करु शकतात. तसेच थेट विशेष न्यायालयाकडे देखील तक्रार दाखल करू शकता असे नमूद करून या प्रकरणात विद्युत अधिनियम फक्त विद्युत अधिनियम मध्येच गुन्हा होत नसून समितीने केलेला चौकशीच्या आधारे भारतीय दंड संहिता भारतीय न्याय संहिता अंतर्गत गुन्हा दाखल होऊ शकतो असे नमूद करून याचिका करता देखील या प्रकरणात थेट पोलीस यांच्याकडे तक्रार दाखल करू शकतात व पोलिसांनी तक्रार नोंदवली नाही तर त्यांच्या वरिष्ठांकडे कलम १५४ भारतीय दंड संहिता प्रमाणे तक्रार करू शकता व त्यानंतरही पोलिसांनी कारवाई केली नाही तर कलम १५६ (३)भारतीय दंड संहिता प्रमाणे प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करू शकता यामुळे सदर याचिकेमध्ये निर्देश न देता याचिका करता यांच्या विनंती माननीय उच्च न्यायालयाच्या वरील निदर्शनाच्या आधारे याचिका म ागे घेऊन सदरील प्रकरणात संबंधित पोलीस स्टेशन तसेच न्याय दंडाधिकारी यांच्याकडे तक्रार दाखल करण्यासाठी माननीय उच्च न्यायालयाची मुभा घेतली व माननीय उच्च न्यायालयाने सदरील याचिका निकाली काढली. याचिकाकर्त्याच्या वतीने एडवोकेट नरसिंह लक्ष्मणराव जाधव यांनी काम पाहिले व त्यांना एडवोकैट गौरव खांडे यांनी सहकार्य केले.

## नशेच्या गोळ्या...

याच्याकडून होत असल्याचे उघड झाले. त्यालाही पोलिसांनी अटक केली असून, या गुन्ह्यातील एकूण आरोपींची संख्या आता ६ वर पोहोचली आहे. ही यशस्वी कारवाई पोलिस अधीक्षक नवनीत कावत, अप्पर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस निरीक्षक शीतलकुमार बल्लाळ, सपोनी बाबा राठोड आणि पोलिस अंमलदार सचिन अलगट, संजय राठोड, गहिनीनाथ बावनकर, राम पवार यांच्या पथकाने केली. बीड शहर पोलीस या प्रकरणाचा अधिक तपास करीत आहेत.

## जिल्हा परिषदेच्या...

पदोन्नतीमध्ये विनय सुपेकर यांना अंबाजोगाई येथून सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद बीड येथे शिक्षण विभागातील वरिष्ठ सहाय्यक कैलास तांगडे यांना गेवराई पंचायत समिती शिरूर येथे कार्यरत असलेले धनंजय जोशी यांना ग्रामपंचायत विभाग, जिल्हा परिषद बीड तर पाटोदा येथे कार्यरत असलेले विवेकानंद औसरमल यांना पदोन्नती देऊन शिरूर (कासार) येथे पदस्थापना देण्यात आली आहे. बीड जिल्हा परिषदेचे नूतन मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहमान यांनी पदोन्नतीचा प्रश्न मार्गी लावला. सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप

◆ पान ४ वरून पुढे...

काकडे यांनी सदर पदोन्नतीसाठीची सर्व प्रक्रिया विभागामार्फत पूर्ण त्यामुळे सदर पदोन्नती झाल्या आहेत. समुपदेश न घेतल्याने उलटसुलट चर्चा- जिल्हा परिषदेच्या चार वरिष्ठ सहाय्यक कर्मचाऱ्यांना पदोन्नत्या देण्यात आल्या. मात्र सदर कर्मचाऱ्यांना पदोन्नतीनंतर नियुक्ती देताना नियमानुसार समुपदेशन घेणे गरजेचे होते. मतदार समुपदेशन का घेण्यात आले नाही? याबाबत उलट सुलट चर्चा होत आहे.

## मा.पंकजाताई मुंडे...

कार्यभार घेतल्यापासून त्यांनी पर्यावरणात होणारे बदल, त्यांच्या उपायोजना, प्लास्टिक बंदी, गाड्यांचे होणारे प्रदूषण, जंगल संपत्ती नष्ट होणे, पर्यावरण दिवस अशा अनेक गोष्टींचे चर्चासत्र आणि उपाययोजनांचा अभ्यास आणि त्यांच्या अंमलबजावणीसाठी अनेक निर्णय घेऊन उपाययोजना चालू केल्या आहेत. ताईंच्या मार्गदर्शनाखाली बीड शहरांमध्ये भाजप सक्रिय झाली असून या योजना व अंमलबजावणी मध्ये बीड शहर अग्रेसर आहे. कामाची व्याप्ती व व्यस्तता असताना देखील बीड शहर व जिल्ह्याकडे ताईंनी दुर्लक्ष केलेले नाही. स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पावलावर पाऊल टाकत जिल्ह्याच्या विकासात पुढचे पाऊल टाकत आहेत. त्यांच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, शालेय साहित्य वाटप, रक्तदान शिबिर, स्वच्छता मोहीम याबरोबरच गोरगरीब, वृद्ध, अपंग यांच्यासाठी डोळ्यांच्या विविध आजारांची मोफत तपासणीसाठी नेत्रचिकित्सा शिबिर घेतले जाणार आहे. 'नेत्रचिकित्सा आपल्या दारी' या उक्तीप्रमाणे विविध भागांमध्ये जाऊन मोबाईल व्हॅन द्वारे डोळ्यांच्या तपासण्या करून आनंद ऋषी हॉस्पिटल, अहिल्यानगर यांच्या सौजन्याने व सहकार्याने अत्यल्प दरामध्ये ऑपरेशनची व्यवस्था केली जाणार आहे. विशेषत: आनंद ऋषी हॉस्पिटल, अहिल्यानगर येथे होणाऱ्या ऑपरेशन साठी बीड ते अहिल्यानगर जाणे येणे मोफत व्यवस्था होणार आहे. यातून रुग्णांना नवदृष्टी मिळून नवचैतन्य निर्माण होणार आहे. अशा उपक्रमामधून गोर-गरिबांचे पंकजाताईंना आशीर्वाद आणि दीर्घायुष्य नक्कीच मिळेल, अशी आम्हाला खात्रीच नव्हे तर विश्वास आहे. या मोफत नेत्र शिबिरासाठी मोबाईल व्हॅन दि. २५ जुलै रोजी सकाळी ९ ते १२:३० चांभारवाडा (समाज मंदिर) येथे उपलब्ध असेल व दुपारी ४ ते ७:३० बार्शी नाका (सोमेश्वर मंदिर) येथे उपलब्ध असेल तसेच २६ जुलै रोजी सकाळी ९ ते १२:३० धानोरा रोड (वरद रेसिडेन्सी) येथे उपलब्ध असेल व दुपारी ४ ते ७:३० पांगरी रोड (सारंगकर यांच्या घराजवळ) उपलब्ध असेल तरी परिसरातील नागरिकांनी याचा नक्की लाभ घ्यावा असे भारतीय जनता पार्टी बीड शहर मंडळाच्या वतीने कळविण्यात आले.

## लिंबागणेश येथे...

६००० रुपये मानधन, तसेच रोजगार, शिक्षण व आरोग्य या मूलभूत मुद्द्यांवर तातडीने निर्णय घ्यावेत या मागण्यांसाठी पुकारलेल्या राज्यव्यापी चक्का जाम आंदोलनाला पाठिंबा देण्यासाठी लिंबागणेश येथेही आंदोलन करण्यात आले. आज गुरुवार, दि.२४ रोजी सकाळी अहमदपूर-अहिल्यानगर राष्ट्रीय महामार्गावरील छत्रपती शिवाजी महाराज चौकात सामाजिक कार्यकर्ते डॉ. गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली आंदोलन सुरू झाले. यावेळी सरकारविरोधात घोषणाबाजी करण्यात आली. या आंदोलनात सेवा सोसायटीचे चेअरमन रविंद्र निर्मळ, शिवशक्ती भिमशक्ती विचारमंच प्रदेशाध्यक्ष बाळासाहेब मोरे पाटील यांची समायोजित भाषणे झाली. यावेळी नेकनूर पोलिस स्टेशनचे पोलीस उपनिरीक्षक आप्पासाहेब रोकडे यांच्या मार्फत मागण्यांचे निवेदन मुख्यमंत्री , उपमुख्यमंत्री, बच्च्चूभाऊ कडु यांना देण्यात आले. लिंबागणेश पोलिस चौकीचे सहाय्यक फौजदार बाबासाहेब राख, पो.शि. बाबासाहेब खाडे, विशाल कदम, पो.हे. अनिल राऊत हे देखील उपस्थित होते. आंदोलनात सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ आप्पा गिरे, बाळकृष्ण थोरात, विक्रांत वाणी, सुरेश निर्मळ, संजय घोलप, अभिजित गायकवाड, सय्यद अख्तर, दादा गायकवाड, अंकुश वाणी, भगवान मोरे, भालचंद्र गिरे, तुळशीराम वनवे, गणपत घोलप, प्रकाश ढवळे, धनंजय बागल, दादाराव घाडगे, विशाल वाणी , प्रकाश निर्मळ,संदिप निर्मळ,अजय थोरात आदींचा उत्स्फूर्त सहभाग होता.

## आधी गांजा...

या कारागृहात संवेदनशील गुन्ह्यातील आरोपी आहेत त्या मुळे या

◆ पान ४ वरून पुढे...

कारागृहाच्या हालचालीकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून असते. गेल्या आठवड्यात बीड च्या या कारागृहात एका कैद्याकडे गांजा आढळून आला होता आता एका कैद्याकडे मोबाईल आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसात त्या कैद्या विरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे सांगण्यात येते. या घटनांन मुळे बीड कारागृहात नेमके काय चालू आहे हा प्रश्न उपस्थित केला जात आहे. गेल्या काही दिवसांपूर्वी बीड जिल्हा कारागृहात गांजा आढळून आला होता. सुभेदार बलभीम चिचाणे आणि पोलीस हवालदार अब्दुल वाजेद अब्दुल अजिज हे कर्तव्यावर असताना बराख क्र. ७ मध्ये न्यायालयीन कोठडीत असलेला अक्षय ऊर्फ चिंटू गायकवाड याच्याकडे गांजा आढळून आला होता. त्याच्यघा विरोधातही शिवाजीनगर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनाक्रमाने बीडच्या न्यायालयात नेमके काय चालू आहे असा सवाल उपस्थित होतो.

## खा.सोनवणेंकडून...

यावेळी शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्ग मधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथील अपूर्ण असलेली सर्व कामे तातडीने पूर्ण करण्याची मागणी केली. माजलगाव-केज बिटम धील नादुरुस्त भागांची दुरुस्ती व तांत्रिक दोष दूर करण्याबाबत निर्देश द्यावेत, धारूर घाटातील प्रस्तावित वळण मार्गाचे काम तसेच बर्दापूर-लोखंडीसावरगाव चौपदरीकरणाचे काम लवकरात लवकर सुरू करावे, केज-कळंब मधील मांजरा नदीवरील पुलाच्या कामासंदर्भात निर्माण झालेल्या अडचणी दूर करून काम पूर्ण करावे, पैठण-पंढरपूर रस्ता व अहम दपूर-मांजरसुंबा-पाटोदा या रस्त्यांवरील समस्या तातडीने सोडवाव्यात व प्रस्तावित अतिरिक्त बाबींना मंजुरी देण्यात यावी. छत्रपती संभाजीनगर-बीड-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील गढी येथील उड्डानपुल व रस्ता हा विभागाच्या तांत्रिक दोषामुळे अपघात होऊन ६ युवकांचा दुर्दैवी मृत्यू ओढवला. या तांत्रिक दोषाची जबाबदारी निश्चित करण्यात यावी. मयतांच्या कुटूंबियांना मदत करण्यात यावी, अशी आग्रही मागणी केली. या सर्व मुद्द्यांकडे ना.गडकरी यांनी वैयक्तिक लक्ष घालण्याचे आश्वासन दिले व उर्वरित कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी संबंधितांना सूचना दिल्या. याच वेळी 'तुमचा बीड जिल्ह्याच्या विकासासाठीचा पाठपुरावा आणि धडपड चांगली आहे', अशा शब्दात पाठीवर थाप देवून कौतूक केले. यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांची त्यांच्या संसदभवन कार्यालयामधे खा.सोनवणे यांनी भेट घेतली. यावेळी, आहिल्यानगर-बीड-परळी रेल्वे प्रकल्पाअंतर्गत प्रस्तावित १० रोड ओव्हर ब्रिज व ढोलेवस्ती (बीड) रोड अंडरपासचे काम त्वरीत सुरू करण्यात यावे. बार्शीनाका (बीड शहर) रेल्वे स्टेशनवर प्रवासी संख्येच्या प्राथमिकतेच्या आधारे थांबा देण्यास मंजुरी देणे, अंबाजोगाई तालुक्यातील घाटनांदूर रेल्वे स्टेशनवर रेल्वेगाड्यांना थांबा देण्याचा प्रस्ताव मंजूर करून आदेश त्वरित निर्गमित करणे, बीड-आहिल्यानगर-सीएसटी (मुंबई) अशी नियमीत रेल्वेसेवा लवकर सुरू करावी, अशी मागणी केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी सकारात्मकता दाखवित मागण्यांसदर्भात कार्यवाही करण्याचा शब्द दिला.

## अण्णासाहेब पाटील...

टाळणे. मराठवाड्यातील मराठा समाजापर्यंत पोहोचून त्यांना महामंडळाच्या योजनांचा लाभ मिळवून देऊन जास्तीत जास्त लाभार्थी उद्योजक घडविणे. यासाठी बँकेत प्रलंबित कर्ज प्रकरण संदर्भातील तक्रार निरसन करून व्याज परतावा त्रुटींबाबत मार्गदर्शन करून उश्ररळा क्श्रेव, डरपलींळेप क्श्रेव विषयी हेल्पलाईन सेंटरच्या माध्यमातून समस्या निवारण करणे असे या उप विभागीय कार्यालयाच्या उद्धघाटना मागील उद्दिष्टे आहेत. मराठवाडा विभागातील हे कार्यालय सुसज्ज आणि अद्ययावत असणार आहे. पात्र लाभार्थ्यांना या ठिकाणी महामंडळाकडून देण्यात येणाऱ्या सर्व सुविधा येथे उपलब्ध असतील. या उपविभागीय कार्यालयामुळे म राठवाड्यातील लाभार्थी यांचा वेळ वाचेल. अधिकाधिक लाभार्थी यांना म हामंडळाच्या योजनांचा लाभ देण्यासही लाभार्थी व महामंडळ यांना सोयीचे होईल. तालुकास्तरावर देखील महामंडळाच्या योजना पोहोचविण्यासाठी आगामी काळात दौरे करण्यात येणार असल्याचे महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील यांनी सांगितले. अण्णासाहेव पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेची व्याप्ती वाढवण्यासाठी उप विभागीय कार्यालय राजू कॉम्प्लेक्स,२रा मजला, हिना हॉटेल समोर, जालना रोड, बीड येथे सुरु करण्यात येत आहे. या निमित्त यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड

◆ पान ४ वरून पुढे...

येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या महामंडळाच्या उप विभागीय कार्यालय उद्घाटन समारंभास जनतेने मोठ्या संख्येने उपस्थित रहावे व मेळाव्यात सहभागी होऊन महामंडळाच्या योजनेची माहिती घ्यावी. याबरोबरच लाभार्थ्यांनी स्वत:ची समस्या निवारण करून घ्यावे, असे आवाहन श्री. आगवण पाटील यांनी केले.

## बीड तालुका काँग्रेस ...

बाबासाहेब बहिरवाळ, नाळवडि सर्कल प्रमुख देवकते भगवान जनार्दन, बहिरवाडी सर्कल प्रमुख संतोष हरीभाऊ घोंगडे, चौसाला सर्कल प्रमुख अशोक मारुती शिंदे, नेकनुर सर्कल प्रमुख सोमनाथ बुवासाहेब शिंदे, लिंबगणेश सर्कल प्रमुख अंकुश सुखदेव घोलप, राजुरी नवगण सर्कल प्रमुख शेख इरफान शेख शफीक, चौरे गोपीनाथ भगवान, शेख इरफान छोटेमियां इनामदार, बेदरे संतोष राम, डोके अनिल, संतोष नवले, घोंगडे अजित, सुशील सोपान मोरे, शेख राजु मुसा, आनंद काशिनाथ पवार आदी पदाधिकाऱ्यांच्या निवडी करण्यात आल्या असुन या सर्व निवडी राज्यसभा खासदार रजनीताई अशोकराव पाटील, माजी मंत्री अशोकराव पाटील साहेब, प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ साहेब, जिल्हाध्यक्ष राहुल भैया सोनवणे यांच्या नेतृत्वात करण्यात आल्या असल्याची माहिती तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी कळवले आहे.

## नवीन हायव...

सुनील पोपळे शिवाजी ढाकणे आसाराम हातगुले संतोष भोसले आधी पत्रकाराने याबाबत वार्तांगण करून व बातम्या देऊन प्रमाणात आवाज उठविला आहे . वारंवार सर्वांनी ग्राहक पंचायत कार्यास सहकार्य केले आहे. इतर संघटनेने देखील या प्रकरणी आवाज उठविला आहे परंतु अद्याप पर्यंत दुभाजक काम झालेले नाही. अशा प्रकारची सेवा अनेक ठिकाणी उपलब्ध आहे. याचबरोबर मोंढा भाग, पंचायत समिती रोड, शिवाजी चौक या भागात अंडर ग्राउंड पुल असणे आवश्यक आहे. म्हणजे विद्यार्थी ज्येष्ठ नागरिक महिला आधी जणांना रस्ता ओलांडणे त्रास दायक होणार नाही व अपघात होणार नाहीत. दुभाजक ची सेवा अनेक शहरात उपलब्ध आहे परंतु गेवराई प्रमुख शहर मध्यवर्ती ठिकाण असून अद्याप पर्यंत मागणी करून उपलब्ध झालेली नाही. याबाबत उपविभागीय अभियंता विशेष प्रकल्प उपविभाग क्रमांक ५ गेवराई यांनी त्यांचे पत्र क्र. ८४ दिनांक २१ -१२-०४ अन्वये या विभागामार्फत अतिक्रमण हटविण्याचे काम होणार असून रस्ता आणखीन रुंद होईल यासाठी आपल्यासारख्या सुजान नागरिकाकडून या मोहिमेस मदत करावी त्यानंतर गरज भासल्यास पुढे सहा महिन्यानंतर दुभाजक मागणीचा विचार करण्यात येईल असे कळविण्यात आले होते परंतु शासनाने अद्याप पर्यंत संबंधित कार्यालयाने दखल घेतलेली नाही. त्यानंतर त्या जागेवर वारंवार अतिक्रमण होत आहे व नागरिकाला विनाकारण त्रास सहन करावा लागतो तरी यावर दुभाजक केल्याशिवाय पर्याय नाही दुभाजक बांधण्याची कारवाई तात्काळ हाती घ्यावी अशी पुन्हा मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत उपाध्यक्ष अनिल बोर्डे प्रा. भानुदास फलके ॲड बी एम मुळे मोहन राजहंस विश्वास चपळगावकर गणेश रामदासी कैलास मडकर आदींनी केलेली आहे.

## बीड शहरात...

किमत ७० ते ७५ हजार असर्ताना या सोलार पोलची किमत २ लाख २१ हजार ९८ रु. दाखविण्यात आलेली आहे. नगरोत्थान अभियाना अंतर्गत साबेर कन्स्ट्रक्शन पाटोदा यांच्याकडून बीड शहरात बसविण्यात आलेल्या सोलार पोलची किमत ६० ते ६५ हजार रुपये असून त्याची किंमत २ लाख ३ हजार ८०० रु. इतकी दाखविण्यात आलेली आहे. सदरील साहित्य खडख मार्क असलेल्या कंपनीची साहित्य न वापरता चायना कंपनीचे साहित्य ज्याला मान्यता नाही असे वापरले आहे. काम करणाऱ्या दोन्ही एजन्सी कडून भष्ट्राचार करण्यात आला असून निकृष्ट दर्जाचे साहित्य वापरुन न.प. मुख्याधिकारी बीड यांच्या संगनमताने करण्यात आला आहे. या भष्ट्राचार प्रकरणी काम करणाऱ्या संबंधित एजन्सीची चौकशी करण्यात यावी या करीता दि. २८ फेब्रुवारी २०२५ ते १३ मार्च २०२५ रोजी चौकाशी करुन त्याचे देयक थांबविण्यात यावे. या करीता निवेदन देण्यात आले होते. संबंधिताची चौकशी न करता त्याचे देयक देण्यात आले आहेत. यामध्ये बीडच्या सी.ओ नीता अंधारे, अभियंता व एजन्सीची चौकशी करून योग्य ती कार्यवाही करण्यात यावी अशी मागणी करण्यात आली आहे.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## महादेव मुंडे हत्या प्रकरणातील आरोपींना आठ दिवसात अटक करा...

# अन्यथा अठरा पगड जातीचे लोक तुम्हाला बीडमध्ये एकत्र आलेले दिसतील: संघर्ष योध्दा मनोज जरांगे

**बीड । प्रतिनिधी**

मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे या न्यायासाठी सरकारकडे दाद मागत आहेत. काल ज्ञानेश्वरी मुंडे यांनी मनोज जरांगे यांची भेट घेतली. यावेळी जरांगे यांनी सरकारला गंभीर इशारा दिला आहे. यावेळी बोलताना मनोज जरांगे म्हणाले की, आम्ही कायम महादेव मुंडे यांच्या कुटुंबासोबत राहणार आहोत आणि न्याय भेटल्याशिवाय मागे हटणार नाही. हत्या किती क्रूरपणे झाली हे कुणाला माहीत नव्हते, पण पोस्टमार्टेम रिपोर्ट आल्यानंतर सर्वांना माहीत झाले. महादेव मुंडे यांची हत्या झाल्यानंतर आरोपी आठ दिवस मांस घेऊन फिरत होते. मुख्यमंत्री यांना मान खाली घालयला लावणारी बाब आहे. कारण तुमच्या राज्यात महादेव मुंडेचा खून होतो आणि ते आरोपी दोन वर्षे सापडत नाहीत. असे मुडदे पडत असतील तर बीड जिल्ह्यातील लोकांनी आता जागे झाले पाहिजे. फडवणीस यांचं राज्य गुंड चालवतात का? तुम्हाला या राजगादीवर बसवणारी गोरगरीब जनता आहे. मुख्यमंत्री यांनी महादेव मुंडे यांच्या कुटुंबाला भेटण्यासाठी वेळ द्यावा, ते वेळ का देऊ शकत नाही? महादेव मुंडे प्रकरणात जो काही तपास होत आहे, तो तपास ज्ञानेश्वरी मुंडे यांना सांगितला पाहिजे. महादेव मुंडे प्रकरणात पहिल्या दिवसापासून ज्या अधिकाऱ्यांच्या बदल्या झाल्या त्यांचे आम्हाला सीडीआर पाहिजेत. महादेव मुंडे प्रकरणात बीडच्या जनतेने रस्त्यावर उतरायचे ठरवले किंवा आंदोलन करायचे ठरवले तर मुख्यमंत्र्यांना अवघड जाईल, मी मनोज जरांगे तुम्हाला विनंतीपूर्वक सांगत



आहे की, आठ दिवसाच्या आत एसआयटी गठीत करा, त्यात मुंडे कुटुंबाचे माणसे घ्या, आरोपी अटक केल्यानंतर मुंडे कुटुंबांना सरकारी वकील द्या. या कुटुंबाला शंभर टक्के धोका आहे आणि त्यांना पोलीस संरक्षण देण्यात यावे. बीडचे पालकमंत्री अजित पवार यांना न्याय देता येत नसेल तर त्यांनी बीड जिल्हा सोडून द्या, आम्हाला त्यांची काहीही गरज नाही, आम्हाला न्याय मिळत नसेल तर तुम्ही पालकमंत्री म्हणून काय करता आमचे मुडदे पाडता का? अजित पवार पालकमंत्री झाले तर बीडचा चेहरा मोहरा बदलेल असे आम्हाला वाटत होते पण तसे झाले नाही. फडवणीस आणि अजित दादा पवार यांना विनंती आहे की, दोघांनीही आठ दिवसाच्या आत आरोपी अटक करावी. आठ दिवसाच्या आत कारवाई झाली नाही तर अठरा पगड जातीचे लोक तुम्हाला बीड मध्ये एकत्र आलेले दिसतील, आणि कसा मोर्चा असतो हे तुम्हाला दिसेल असा इशारा जरांगे पाटलांनी सरकारला दिला आहे

## भर पावसात अंगणवाडी सेविका व मदतनिसांचा संताप; बीड जिल्हा परिषदेसमोर तीव्र आंदोलन, प्रशासनालाही घाम फोडला!

**बीड । प्रतिनिधी**

अंगणवाडी सेविकांच्या प्रलंबित मागण्यांसाठी गुरुवारी (२४ जुलै) बीड जिल्हा परिषदेसमोर महाराष्ट्र राज्य अंगणवाडी सेविका व मदतनीस महासंघाच्या वतीने तीव्र निदर्शने व धरणे आंदोलन करण्यात आले. भर पावसातही मोठ्या संख्येने उपस्थित राहून सेविकांनी प्रशासनाच्या मनमानी विरोधात आवाज उठवला. शेवटी जिल्हा कार्यक्रम अधिकारी यांनी स्वतः आंदोलनस्थळी येऊन सेविकांचे निवेदन स्विकारले. एफ.आर.एस. (ऋछड) प्रणालीद्वारे टी.एच.आर. (ढक्ठ) वितरण करताना भेडसावत असलेल्या तांत्रिक अडचणी, मोबाईल हँग होणे, ओटीपी न येणे, नेटवर्क नसणे यामुळे कामाचा ताण वाढला असून यावर कोणताही तोडगा प्रशासनाकडून निघालेला नाही, असा आरोप सेविकांनी केला. त्याचबरोबर, पेन्शन,



ग्रॅच्युईटी आणि ऑक्टोबर २४ ते जून २५ चा प्रोत्साहन भत्ता तात्काळ वितरित करावा, प्रोत्साहन भत्ता नियमित मानधनात समाविष्ट करून सेविकांना १५,००० व मदतनिसांना ८,५०० रुपये दरमहा मानधन देण्यात यावे, अंगणवाडीचे वेळापत्रक सकाळी ९.३० ते दुपारी २.३० पर्यंतच लागू ठेवावे, सक्तीची ४ वाजेपर्यंतची अट हटवावी, अशा अनेक महत्त्वाच्या मागण्यांसह आंदोलन करण्यात आले. भगवान देशमुख, कमल बांगर, दत्ता देशमुख, सचिन आंधळे यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या या आंदोलनात बीड जिल्ह्यातील विविध भागांतील अंगणवाडी सेविका व मदतनीस या आंदोलनात सहभागी झाल्या. प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे सेविकांमध्ये प्रचंड नाराजी असून, मागण्या मान्य न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. भर पावसातही आंदोलक महिलांचा उत्साह आणि संघर्ष प्रशासनाला घाम फोडणारा होता.

## परळीत चंदन तस्कर स्थानिक गुन्हे शाखेच्या ताब्यात आठ लाख ६८ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त

**परळी । प्रतिनिधी**

येथिल रेल्वे पटरी च्या उत्तर बाजूस पालांमध्ये काही इसम चंदनाचे लाकडे तासत आसल्याची गुप्त माहिती मिळाल्या वरुन बीड येथिल स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पालावर मारलेल्या छाप्यात ८ लाख ६८ हजार रुपयाचे चंदन जप्त केले आहे.

बीड जिल्हा पोलीस अधीक्षक नवनीत कावत यांनी जिल्ह्यातील अवैध धंद्यावर कडक कार्यवाही करण्याचे आदेश दिल्याने स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक शिवाजी बंटेवाड, उप निरीक्षक सुशांत सुतळे यांच्या मार्गदर्शना खाली पो हवा रामचंद्र केकान, पोना गोविंद भताने व पो शी सचिन आंधळे यांच्या टीमला दिनांक २३/०७/२०२५ रोजी रात्री परिसरात पेट्रोलिंग करत असताना गोपनीय माहिती मिळाली की, परळी रेल्वे पटरी च्या उत्तर बाजूस



पालांमध्ये काही इसम चंदनाचे लाकडे तासत आहेत या गोपनीय माहिती च्या आधारे या टीम ने सापळा रचुन त्या पालावर छापा मारला असता पालातील आरोपी फरार झाले आत मध्ये पाहणी करुन खात्री केली असता आत २१७ किलो चंदनाची लाकडे मिळून आली ज्याची किंमत ८ लाख ६८ हजार रुपये आहे. या प्रकरणी अज्ञात आरोपी विरुद्ध परळी येथिल संभाजीनगर पो स्टे मध्येगु. र.न.१५५/२५. ३०३(२)३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## ह.भ.प. परशुराम महाराज मराडे यांची प्रवचन सेवा

**बीड । प्रतिनिधी**



बार्शी रोड वरील स्वराज्य नगर येथील रहिवाशी व बीड जिल्ह्यातील सुप्रसिद्ध कीर्तनकार, ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक ह.भ.प. माधव महाराज डाके यांच्या माऊली निवास्थानी प्रतीवर्षा प्रमाणे यावर्षी ही चातुर्मास उत्सवाचे आयोजन करण्यात आले असून, आषाढी एकादशी ते कार्तिक एकादशी या चार महिन्यांच्या पवित्र पर्वकाळात प्रती सोमवारी रात्री ८ ते ९ यावेळेत विविध ज्ञानेश्वरी ग्रंथ प्रेमी महाराज मंडळींची श्री ज्ञानेश्वरी प्रवचन सेवा संपन्न होत आहे. या चातुर्मास उत्सवा निम्मित सोमवार दिनांक २८ रोजी रात्री ८ते९ या वेळेत ह भ प प्राचार्य परशुराम महाराज मराडे सर (ज्ञानेश्वरी गाथा ग्रंथाचे गाढे अभ्यासक) तथा मठाधिपती तुकोबाराय सेवा पीठ तळेगाव यांची प्रवचन सेवा होणार आहे.

## शिक्षणमहर्षी शामराव गदळेंनी ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली : नंदकिशोर मुंदडा

**शाम गदळे विद्यालयात पंकजाताईंच्या वाढदिवसानिमित्त वृक्षारोपण, गुणवंतांचा सत्कार**

**केज । प्रतिनिधी**

शिक्षणमहर्षी शामराव गदळे गुरुजींनी अथक परिश्रम करून वडमाऊली विद्याप्रसारक मंडळाच्या माध्यमातून ग्रामीण भागात शिक्षणाची गंगा आणली. या संस्थेतून शिकलेले अनेक विद्यार्थी आज विविध क्षेत्रात उच्च पदांवर कार्यरत आहेत. गदळे गुरुजींच्या शिक्षण क्षेत्रातील वारशाचे जतन त्यांचे सुपुत्र इंजि. शरद गदळे व डॉ शशिकांत दहिफळकर खंबीरपणे करत आहेत, असे प्रतिपादन भाजपचे ज्येष्ठ नेते नंदकिशोर मुंदडा यांनी केले. गुणवंत विद्यार्थी सत्कार समारंभ व भाजपच्या राष्ट्रीय



सचिव तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त वडमाऊली विद्याप्रसारक मंडळ संचलित दहिफळ वडमाऊली येथील श्याम गदळे कला व विज्ञान महाविद्यालयाच्या प्रांगणात वृक्षारोपण व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा गुरुवारी (दि.२४) सकाळी ११ वाजता पार पडला. यावेळी प्रमुख अतिथी म्हणून नंदकिशोर मुंदडा बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवकृपा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष सखाहरी गदळे होते. यावेळी व्यासपीठावर डॉ. वासुदेव नेहरकर, मुरलीधर ढाकणे, विजयकांत मुंडे, जालिंदर मोराळे, भाजप तालुकाध्यक्ष भगवान केदार, संस्थेचे अध्यक्ष शशिकांत दहीफळकर, भाजप युवा मोर्चाचे तालुकाध्यक्ष राहुल गदळे, इंजि. शरद गदळे, बालासाहेब मोराळे, डॉ.धनराज पवार, संदीपान आंधळे, नामदेव आंधळे, समिरसिंह देशमुख, अशोक गायकवाड, नामदेव गायकवाड, काकासाहेब पाळवदे, डॉ.सुग्रीव ढाकणे, बाबासाहेब कोरडे, अशोक वाघमारे, सचिन गायकवाड, दीपक काळे यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना शाळेच्या गुणवत्तेसह उपक्रमांचे कौतुक केले.

## कुर्ला जि.प. शाळेत वृक्षारोपणातून वर्षपूर्तीचा पर्यावरणपूरक उत्सव

**कुर्ला । प्रतिनिधी**

जल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा, कुर्ला (ता. बीड) यिथे शालेय व्यवस्थापन समितीच्या एक वर्षाच्या यशस्वी कार्यकाळानिमित्त वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शाळेच्या परिसरात विविध प्रकारच्या वृक्षांचे रोपण करत सेवा पूर्तीचा दिवस पर्यावरणपूरक पद्धतीने साजरा करण्यात आला. या कार्यक्रमात शाळेतील शिक्षकवृंद, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्री. तुषार पाटील, सदस्य श्री. दत्ता गुंड व श्री. विक्रम राऊत यांची उपस्थिती होती. यावेळी शाळेच्या विकासात मोलाचा वाटा उचलल्याबद्दल समितीच्या सदस्यांचा शाल, श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमात बोलताना समितीचे अध्यक्ष श्री. तुषार पाटील यांनी सांगितले की, शाळेच्या प्रगतीसाठी सर्व शिक्षक, पालक व ग्रामस्थ यांचे सहकार्य मोलाचे ठरत आहे. ही वाटचाल एकटी समितीची नसून सामूहिक प्रयत्नांची आहे. आगामी काळातही समिती शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध राहील. एक वर्षाच्या कार्यकाळात शाळेसाठी संरक्षण भिंत दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याची सुविधा, विद्यार्थ्यांसाठी बसण्याची योग्य व्यवस्था, दर्शनी भाग सुशोभीकरण, शाळेच्या सुरक्षेसाठी सीसीटीव्ही कॅमेरे बसवणे, शाळेत बायोमेट्रिक मशीन बसवणे, शाळा स्वच्छता आदी विकासकामे यशस्वीरित्या पार पडली आहेत. हा उपक्रम शाळा व ग्रामस्थ यांच्यातील समन्वय अधिक बळकट करणारा ठरला असून, या उदाहरणातून समाजातील इतर संस्थांनी प्रेरणा घ्यावी, असे मतही यावेळी व्यक्त झाले.

**गटविकास अधिकारी यांनी बेकायदेशीर गाव तलाव अतिक्रमण पंचनामा करण्यास सांगितले असून ग्राम विकास अधिकारी मुसळे कडून टाळाटाळ**

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे शेख खिजर व जयदेव शिंगने हे जल समाधी आंदोलन करणार

**बीड । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गाव तलाव पाशी मोठ्या प्रमाणात अतिक्रमण करण्यात आले असून बेकायदेशीर रित्या जागा हडप करून त्यावर बेकायदेशीर रित्या बांधकाम तसेच बोगस पी टी आर तयार करण्यात आले असून हे अतिक्रमण काढण्यासाठी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने आयुक्तालय छत्रपती संभाजी नगर, जिल्हाधिकारी बीड , सीईओ बीड,गट विकास अधिकारी गेवराई, तहसीलदार गेवराई यांना निवेदन देण्यात आली असून गेवराई येथील पंचायत समिती गटविकास अधिकारी यांना ग्रामपंचायत तलवाडा येथील ग्राम विकास अधिकारी यांना जागेचा पंचनामा करून अहवाल सादर करण्यासाठी पत्र काढून सांगितले असता वीस दिवस झाले अद्याप तरी अहवाल सादर झालेला नसून कुठे दाळ शिजत आहे असा प्रश्न सर्वसामान्यांना पडला आहे गटविकास अधिकारी यांच्या आदेशाला ग्रामविकास अधिकारी मुसळे यांच्याकडून केराची टोपली दाखवण्यात येत असल्याचे दिसून येत आहे. याबाबत सविस्तर माहिती अशी की, गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गाव तलावाचं विषय खूप गाजत असून काही लोकांनी चक्क गाव तलाव संरक्षण भिंत कोरून त्या ठिकाणी आपापल्या पद्धतीने जागा धरून तसेच सदरील जागा महसूलची असताना नियमाबाहेर पी टी आर देण्यात आले असून यामुळे गाव तलावाला धोका निर्माण झाला असून काहींनी तर आड माफ जागा पकडून पक्के घर बांधले असून काहींनी तर बेकायदेशीर धंदे मांडले असून कसलाही परवाना न घेता नियम फक्त गरिबालाच का जो मलिदा देईल त्याची जागा याविषयी चांगली चर्चा रंगू लागली असून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या वतीने गाव तलाव बचाव आंदोलन हाती घेतले असून संबंधित विभागाशी निवेदन दिली असून पत्राची दखल घेत गेवराई येथील गट विकास अधिकारी कांबळे मॅडम यांनी संबंधित गटविकास अधिकारी यांना दिनांक९/७/२०२५ रोजी पत्र काढले असून त्यामध्ये असा उल्लेख आहे की संबंधित अतिक्रमण जाग्यावर जाऊन त्याचा पंचनामा करून अहवाल पंचायत समिती येथे सादर करण्यात यावा आज पंधरा दिवस उलटून देखील ग्रामविकास अधिकारी मुसळे यांना वेळ मिळत नसून नेमके दाळ कुठे शिजत आहे असा प्रश्न पडला असून यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी सांगितले की, बेकायदेशीर झालेले अतिक्रमण १४ ऑगस्ट पर्यंत न हटवल्यास १५ ऑगस्ट रोजी त्याच तलावात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे उपयुवा जिल्हाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगणे हे जलसंबंधी घेणार असून आमच्या जीवितास काही धोका झाल्यास संबंधित विभाग यास कारणीभूत असेल लवकरच निवेदन देणार असून त्यासाठी आंदोलन करण्यात येणार आहे..

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती वंदना. व्ही. जोशी दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क. १९८१ / २०२५**

**अलका रमेश डोईफोडे वि. निरंक**

अर्जदार: १. अलका भ्र. रमेश डोईफोडे, वय- ४७वर्षे, धंदा घरकाम, रा. हनुमान मंदिराजवळ, अंबिका नगर, पालवन रोड, बीड ता.जि.बीड, २.वरुण पि. रमेशराव डोईफोडे, वय-२८ वर्षे, धंदा- शिक्षण रा. वरीलप्रमाणे, ३. वैष्णवी पि.रमेश डोईफोडे, वय- २४ वर्षे, धंदा-शिक्षण रा. वरीलप्रमाणे, ४. शारदाबाई भ्र.पांडुरंग डोईफोडे, वय-७० वर्षे, धंदा- घरकाम, रा. परवाना नगर, आकाशवाणी रोड, बीड ता. जि. बीड

विरुध्द

गैरअर्जदार- निरंक

**प्रकरण- भारतीय वारसा कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.**

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत रमेश पि. पांडुरंग डोईफोडे यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत रमेश पि. पांडुरंग डोईफोडे हे दिनांक ०१/०७/२०२५ रोजी जिल्हा रुग्णालय, बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क. १ ही मयताची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा मयताचा मुलगा तर अर्जदार क. ३ ही मयताची मुलगी असुन अर्जदार क्र. ४ ही मयताची आई आहे. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय व निमशासकीय कामासाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणुन सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरील अर्जदार हे सदरहु मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिध्द झाल्यापासून तीस दिवसाच्या आत त्यांनी या न्यायालयात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु न्यायालय सदरहु अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहु, मयत नामे **रमेश पि. पांडुरंग डोईफोडे रा. हनुमान मंदिराजवळ, अंबिका नगर, पालवन रोड, बीड ता. जि. बीड** यांचे अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस म्हणुन घोषीत करुन अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक २१/०७/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

**पुढील तारीख ०३/०९/२०२५.**
**(मार्फत- अँड. गडकर एम. ए.)**

**आदेशावरून.**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**

**(स्वाक्षरीत)**
**अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय व.स्तर, बीड**

दैनिक
महाराष्ट्राचा बुलंद आवाज • छत्रपती संभाजीनगर • जालना • बीड • परभणी • लातूर • नांदेड • धाराशिव • हिंगोली • अहिल्यानगर
# मराठवाडा पत्र
संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे





*ॲड. गोविंद शिराळे यांना वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना सन्माननीय वकील संघातील सदस्य व पदाधिकारी छायाचित्रात दिसत आहेत.*

## महत्वाचे

### अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा उप विभागीय कार्यालयाचे २७ जुलै रोजी उद्धघाटन

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाड्यातील महामंडळाची वाढती व्याप्ती लक्षात घेऊन, अण्णासाहेब पाटील विकास फाउंडेशनच्या विशेष सहकार्यातून कार्यान्वित होणाऱ्या अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या मराठवाडा विभागाच्या उपविभागीय कार्यालयाचे उद्धघाटन रविवार, २७ जुलै, २०२५ रोजी सकाळी ११ वाजता यशवंतराव चव्हाण नाट्यगृह, बीड येथे होत आहे. या कार्यालयाच्या उद्धघाटन समारंभाच्या निमित्ताने बीड येथे मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन महामंडळाचे विभागीय समन्वयक प्रवीण आगवण पाटील यांनी केले. अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळाच्या योजनेचा मराठवाड्यात प्रचार, प्रसारासाठी व्याप्ती वाढवणे. मराठवाड्यातील जिल्ह्यातील लाभार्थ्यांची महामंडळाच्या निगडीत कामाकरीता ई-सेवा केंद्र, CSC सेंटर, खासगी ऑनलाईन सेंटर अथवा एजंटकडून होणारी फसवणूक ▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड तालुका काँग्रेस पक्षाची कार्यकारणी जाहीर प्रामाणिक काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना संधी : गणेश बजगुडे पाटील

**बीड । प्रतिनिधी**

तालुका काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षपदी नुकतीच फेरनिवड झाल्यानंतर तालुकाध्यक्ष गणेश बजगुडे पाटील यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकाला सामोरे जाताना काल बीड तालुका काँग्रेसची सर्वसमावेशक व विस्तारीत कार्यकारणी जाहीर केली असुन प्रामाणिक काम करणाऱ्या सर्वसामान्य कार्यकर्त्यांना तालुका कार्यकारणीत संधी दिल्याचे त्यांनी कळवले असुन बीड तालुका काँग्रेसच्या उपाध्यक्षपदी शेख कादर बाबामिया इनामदार, श्रीमंत साहेबराव घोडके पाटील, कल्याण लक्ष्मणराव टेकाळे, रवींद्र राजेंद्र गायके सरचिटणीस पदी कृष्णा सोपान साळुंखे, संदीपान पंढरीनाथ पवार, शेख अर्शद मुज्जमिल, काळे अनिल लक्ष्मण, सचिव पदी बाबासाहेब विठ्ठलराव पाटोळे, रमेश प्रतापसिंह ठाकुर, शेख करीम, गोरे नवनाथ यांची तर सोशल मीडिया अध्यक्षपदी झोडगे बालाजी हनुमंतराव यांची निवड करण्यात आली. त्याच बरोबर सदस्य पदी पाली सर्कल प्रमुख योगेश ▶▶ उर्वरित पान २ वर

### नवीन हायवे मधील गेवराई शहरातील रस्त्यावर दुभाजक करणेबाबत : अनिल बोर्डे



**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई येथील हायवे पासून बस स्थानक समोरील रस्त्यावर दुभाजक करण्याची मागणी ग्राहक पंचायत सन १९९८ पासून करीत आहे. दुभाजक बाबत ज्येष्ठ पत्रकाराचा मोठ्या प्रमाणात पाठिंबा व सहकार्य होते याबाबत वारंवार बातम्या प्रसिद्ध केलेल्या आहेत परंतु अद्याप पर्यंत दुभाजक झालेले नाही या रस्त्यावर दुभाजक असणे अत्यंत आवश्यक बाब आहे अशी मागणी बीड जिल्हा ग्राहक पंचायत महाराष्ट्र उपाध्यक्ष अनिल बोर्डे यांनी निवेदनाद्वारे मा. जिल्हाधिकारी बीड, कार्यकारी अभियंता विशेष प्रकल्प विभाग बीड, सहाय्यक अभियंता श्रेणी १ सार्वजनिक बांधकाम उपविभाग गेवराई, मुख्याधिकारी नगरपरिषद गेवराई यांच्याकडे केलेली आहे. गेवराई येथील महामार्गापासून येणाऱ्या रस्त्यावर बस स्थानक न्यायालय बँका न्यायालय शाळा रुग्णालय महाविद्यालय पंचायत समिती पाटबंधारे व सार्वजनिक बांधकाम विभाग महावितरण कृषी मोंढा बाजार व इतर कार्यालय मोठ्या प्रमाणात आहे. या रस्त्यावर मोठ्या प्रमाणात वाहतूक आहे. गेवराई शहरातील ज्येष्ठ पत्रकार सुभाष मुळे ,मधुकर तौर, काजी अमान, गणेश क्षीरसागर सुभाष सुतार ▶▶ उर्वरित पान २ वर

### बीड शहरात बोगस, निकृष्ट दर्जाचे सोलार पोल व हायमास्ट दिवे बसवलेल्या कामाचे बिल देऊ नये : अक्षय कोकाटे



**बीड । प्रतिनिधी**

सुवर्ण जयंती शहरी नगरोत्थान व दलित वस्ती योजने मधुन शहरात बसविण्यात येणाऱ्या सोलार पोल हायमास्ट-दिवे बसविणाऱ्या कन्स्ट्रक्शन कंपनीकडून निकृष्ट दर्जाचे सामान वापरुन साहित्य खरेदीत भष्ट्राचार करणाऱ्या एजन्सीचे देयक थांबवा असे लेखी स्वरुपात जिल्हाधिकारी त्यांना निवेदनाद्वारे रिपाई चे नेते अक्षय कोकाटे यांनी मागणी केली आहे. बीड न.प. च्या वतीने नगरोत्थान महाअभियानातंतर्गत व दलित वस्ती अंतर्गत बीड शहरात सोलार पोल हायमास्ट दिवे शहरात बसविण्यात येत आहेत. सदरील कामास ५ कोटी २५ लाख ४३ हजार रुपयाची मान्यता देण्यात आलेली आहे. व दलीत वस्ती मधील ६ प्रभागात सोलार पोल हायमास्ट दिवे व विद्युत साहित्य बसविण्याची १ कोटी रुपयाची मान्यता दिलेली आहे.य मा. मुख्याधिकारी न.प.बीड व न.प. अभियंता उदय ई-पिल्ले यांच्या संबंधित मोहीनीराज कन्स्ट्रक्शन व संदिप इलेक्ट्रीकल्स यांच्या एजन्सीकडून १ कोटी रुपायाचे सोलार पोल व हायमास्ट बसविण्याचे काम करण्यात आलेले आहे. नगरोत्थान अभियानातुन ५ कोटी २५ लाख ४३ हजार रुपयाचे काम साबेर कन्स्ट्रक्शन पाटोदा यांच्याकडून करण्यात आलेले आहे. सदरील कामातील दलित वस्ती अंतर्गत बसविण्यात आलेले सोलार पोलची ▶▶ उर्वरित पान २ वर

### उच्च न्यायालयाने बीड येथील अनाधिकृत पोल विक्री प्रकरणात...

# पोलिसाकडे याचिकाकर्त्याला गुन्हा नोंद करण्याची दिली मुभा !

**बीड । प्रतिनिधी**

● महावितरणच्या अधिकाऱ्यात खळबळ ; कंत्राटदार येणार गोत्यात !
● खासबाग फिडर देवी पोल अनाधिकृत विक्री प्रकरण !
● याचिकाकर्त्य शेख बिलाल यांनी केले समाधान व्यक्त !





खासबाग फिडर देवी लाईन पोल अनाधिकृत काढून विक्री केल्याप्रकरणी पोलिसाकडे गुन्हा दाखल करण्यासाठी याचिकाकर्त्याला तक्रार करण्याची मुभा माननीय उच्च न्यायालयाचे आदेश देण्यात आल्याने महावितरण कंपनीच्या अधिकारात एकच खळबळ माजली आहे. या प्रकरणात कनिष्ठ ते वरिष्ठ अधिकारी व कंत्राटदारावर पोलिसात गुन्हा नोंद करण्याची मुभा दिली असल्याने बीडच्या इतिहासात प्रथमच महावितरणच्या अधिकाऱ्यावर गुन्हा नोंद होणार आहे.

बीड येथील एका राजकीय कार्यकर्ते यांनी अधीक्षक अभियंता संचालन महावितरण प्रादेशिक कार्यालय औरंगाबाद यांच्याकडे तक्रार केली होती. सदरील तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित सहाय्यक अभियंता मिसाळ यांची चौकशी करणेबाबत विविध वृत्तपत्रांमध्ये बातमी जिल्हाधिकारी कार्यालय बीड व वरिष्ठ कार्यालयाकडून तक्रारी प्राप्त झाल्यामुळे अनिलकुमार पाटील कार्यकारी अभियंता स. ब. सु विभाग बीड यांनी २९/८/२०२३ रोजी चौकशी समिती गठीत केली होती. सदरील चौकशी कमिटी मध्ये राहुल भाऊराव जायभाये उपकार्यकारी अभियंता विभागीय कार्यालय बीड, हे समितीचे अध्यक्ष तर सुधाकर दगडू जी जाधव ▶▶ उर्वरित पान २ वर

## नशेच्या गोळ्या विक्री प्रकरण : मेडिकल चालकासह दोघांना अटक, अटकेतील आरोपींची संख्या सहावर

**बीड । प्रतिनिधी**



शहर डीबी पथकाने नशेच्या गोळ्यांची विक्री करणाऱ्या रॅकेटवर पुन्हा एकदा कारवाई करत दोन जणांना अटक केली आहे. अटकेत आलेल्यांमध्ये एका मेडिकलचे चालक व त्याला गोळ्या पुरवणारा तरुण यांचा समावेश आहे. पोलिस अधीक्षक नवनीत कावत यांनी नशाखोरीविरोधात कडक कारवाईचे आदेश दिल्यानंतर बीड शहर पोलिसांकडून गेल्या काही महिन्यांपासून विशेष मोहिम राबवली जात आहे. याअंतर्गत दोन महिन्यांपूर्वी चार जणांना अटक करत सुमारे साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला होता. अटक करण्यात आलेले सर्व आरोपी सध्या न्यायालयीन कोठडीत आहेत. या प्रकरणाच्या पुढील तपासात इस्मालमपूरा येथील शेख फारुक शेख आरेफ याने अल्फ्राझोलम गोळ्यांची विक्री केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी त्याला ताब्यात घेऊन सखोल चौकशी केली असता, त्याला या गोळ्यांचा पुरवठा शहेंशाहर नगर येथील इनामदार मोहम्मद तारीखोद्दीन मोहम्मद नुरुद्दीन ▶▶ उर्वरित पान २ वर

## जिल्हा परिषदेच्या ५ कर्मचाऱ्यांना पदोन्नती ; जाधव आष्टीचे सहाय्यक प्रशासन अधिकारी, तर सुपेकरची सामान्य प्रशासन विभागात नियुक्ती

**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा परिषदेच्या सामान्य प्रशासन कनिष्ठ सहाय्यक, वरिष्ठ सहाय्यक, दर्जाच्या कर्मचाऱ्यांना पदोन्नती देण्याचा निर्णय बीड जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी घेतला. दिनांक १६ जुले जुलै २०२५ रोजी सदर पदोन्नतीचे आदेश देण्यात आले आहे. यामध्ये चार जणांना कनिष्ठ प्रशासन अधिकारीपदी पदोन्नती देण्यात आली आहे. तर एका जनास सहाय्यक प्रशासन अधिकारी म्हणून पदोन्नती देण्यात आली.

गेवराई येथे कनिष्ठ प्रशासन अधिकारी कार्यरत असलेले श्रीकृष्ण जाधव यांना सहाय्यक प्रशासन अधिकारी पदोन्नती देण्यात आली. त्यानं त्यांना पंचायत समिती आष्टी येथे पदस्थापना देण्यात आली आहे. वरिष्ठ सहाय्यक असलेल्या चार जणांच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## मा.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस विविध समाजपयोगी उपक्रमाने साजरा होणार: अशोक लोढा

**बीड । प्रतिनिधी**



महाराष्ट्राच्या लोकनेत्या मा.ना.पंकजाताई मुंडे यांचा वाढदिवस २६ जुलै रोजी संपूर्ण महाराष्ट्र राज्यात साजरा होत आहे. या वाढदिवसाचे औचित्य साधून भारतीय जनता पार्टी बीड शहर मंडळातर्फे मोफत नेत्रचिकित्सा शिबिर, रक्तदान शिबिर, स्वच्छता मोहीम, शालेय साहित्य वाटप, वृक्षारोपण आदि उपक्रम २५ जुलै व २६ जुलै रोजी विविध शहरांमध्ये राबविण्यात येत आहेत. या सर्व उपक्रमांचा सर्व स्तरावरील जनतेने लाभ घ्यावा असे आवाहन भारतीय जनता पार्टीचे बीड शहराध्यक्ष अशोक लोढा यांनी केले आहे. महाराष्ट्राच्या लोकनेत्या मा.ना. पंकजाताई मुंडे पर्यावरण मंत्री पदाचा ▶▶ उर्वरित पान २ वर

## लिंबागणेश येथे राज्यव्यापी चक्काजाम आंदोलनाला उत्स्फूर्त प्रतिसाद : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

माजी राज्यमंत्री तथा प्रहार जनशक्ती पक्ष चे संस्थापक अध्यक्ष श्री. ओमप्रकाश (बच्चू) कडु यांनी मांडलेल्या शेतकरी कर्जमाफी, शेतीमालाला हमीभावावर २० टक्के प्रोत्साहन बोनस, कामगार, दिव्यांग व विधवा महिलांना मासिक ▶▶ उर्वरित पान २ वर



## आधी गांजा, आता मोबाईल, बीडच्या कारागृहात नेमके काय चालू ?

**बीड । प्रतिनिधी**



बीड जिल्हा कारागृह गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वादग्रस्त पाहायला मिळतं आहे. या कारागृहात संवेदनशील गुन्ह्यातील आरोपी आहेत त्यामुळे या कारागृहाच्या हालचालीकडे उभ्या महाराष्ट्राचे लक्ष लागून असते. गेल्या आठवड्यात बीडच्या या कारागृहात एका कैद्याकडे गांजा आढळून आला होता आता एका कैद्याकडे मोबाईल आढळून आल्याने खळबळ उडाली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसात त्या कैद्या विरुद्ध गुन्हा दाखल झाल्याचे सांगण्यात येते. या घटनांन मुळे बीड कारागृहात नेमके काय चालू आहे हा प्रश्न उपस्थित केला जात आहे बीड जिल्हा कारागृह गेल्या काही दिवसांपासून सातत्याने वादग्रस्त पाहायला मिळतं आहे ▶ उर्वरित पान २ वर

## आवादा कंपनीच्या विरोधात शेतकऱ्यांचे केज तहसील समोर आंदोलन

**केज । प्रतिनिधी**



आवादा कंपनीची केज तालुक्यातील दंडेलशाही काही थांबण्याचे नाव घेत नसून, गुंडांना हाताशी धरून काही शेतकऱ्यांच्या शेतातून विद्युत वाहिनी टाकण्याचे काम सुरू केले आहे. हे काम थांबवावे म्हणून शेतकऱ्यांनी आजपासून केज तहसील कार्यालय समोर अमरण उपोषण सुरू केले आहे.

# खा.सोनवणेंकडून महामार्ग, रेल्वेसाठी सतत पाठपुरावा; केंद्रीय मंत्र्यांची भेट घेवून मांडले प्रश्न

**पाठपुराव्यातील चिकाटी पाहून केंद्रीय मंत्री गडकरींनी थोपटली पाठ, रेल्वेमंत्री वैष्णव यांच्याकडून मागण्यासंदर्भात सकारात्मकता**



● बीड जिल्ह्याच्या सर्वांगीण प्रगतीसाठी महामार्ग, रेल्वेचे कामे होणे अत्यंत महत्त्वाचे असून, केंद्रीय मंत्री गडकरीसाहेब यांनी वैयक्तिक लक्ष देतो, असा शब्द दिला आहे. तर रेल्वेमंत्र्यांनी मागण्यासंदर्भात सकारात्मक प्रतिसाद दिलेला आहे. या प्रकल्पांची अंमलबजावणी लवकरात लवकर होण्यासाठी माझ्याकडून सातत्याने पाठपुरावा केला जाईल. - खा.बजरंग सोनवणे, बीड मतदारसंघ.

● **सादोळाकरांची माणगी केंद्रीय मंत्र्यांपुढे मांडली**

शेगाव-पंढरपूर राष्ट्रीय महामार्गमधील परतूर-माजलगाव बिटमधील सादोळा (ता.माजलगाव) येथे पुल आणि रस्त्याचे काम अपुर्ण आहे. याठिकाणी जमीनीवरूनही वादविवाद निर्माण झालेले आहेत. यामुळे काम अपूर्ण असून यावर योग्य तो मार्ग काढून तेथील काम पूर्ण करावे, यासाठी मागील काही दिवसांपुर्वी सादोळाकरांनी उपोषण केले होते. यानंतर दि. २४ जुलै रोजी खा.सोनवणे यांनी सादोळाकरांचा प्रश्न थेट केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्यापुढे ठेवला. रस्त्यासंदर्भात जनभावना लक्षात घेवून तो प्रश्न तातडीने सोडवू, असे मंत्री गडकरी म्हणाले.

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील विविध राष्ट्रीय महामार्गाचे काम तातडीने पुर्ण करावेत, महामार्ग कामे करीत असताना जिथे-जिथे तांत्रिक दोष झालेले आहेत ते दुरुस्त करावेत, भेगा पडलेल्या महामार्गांची दुरूस्ती करावी, अशा विविध मागण्यांसाठी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांची दिल्लीत भेट घेतली. यावेळी सततचा पाठपुरावा पाहून मंत्री नितीन गडकरी यांनी पाठ थोपटली. तर जिल्ह्यातील रेल्वेच्या संदर्भात केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांची भेट घेवून रेल्वे संदर्भातील विषयावर चर्चा केली. यावेळी मंत्री वैष्णव यांनी रेल्वेसंदर्भाने मांडलेल्या सर्व मागण्यांबाबत सकारात्कता दर्शवली. दि.२४ जुलै रोजी खा.बजरंग सोनवणे यांनी केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या कार्यालयात त्यांची भेट घेतली. ▶▶ उर्वरित पान २ वर